FORM 1A 0068625

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई शहर पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. 02 वर्ष 2024 दिनांक 02/02/2024
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलमे Sections कलम 7
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार तारीख पासून 21/08/23 वेळ 13:36 तारीख पर्यंत 21/8/23 वेळ 13:58 वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✔ अशी खूण करा) (Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 8/11/2023 वेळ ........
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 13/2024 तारीख 02/02/2024 वेळ 10:15 वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ..0..

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव G.S.T. भवन, ठिकाणाचे नंबर ........ गल्ली ........ रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण माझगाव गाव माझगाव पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव इसान इनामदार (पोलीस निरीक्षक) वडिलांचे / पतीचे नाव महंमद
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ........ 44 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 8308800610
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लिम जात Caste ........, पोटजात Sub-Caste ........
(h) पत्ता ला.प्र.वि. गल्ली / वार्ड नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ ओळख नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव हर प्रसाद रोड जवळचे ठिकाण ........ गाव वरळी पोस्ट वरळी पो. स्टे. वरळी
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा मुंबई शहर राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (अपराधाचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर लिहावे ...)
Details Name and Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on form 1-B or attach FIR 1-B to case diary)

① श्री अर्जुन प्रकाश सूर्यवंशी वर्ग-1 राज्यकर आयुक्त वस्तु व सेवाकर विभाग व
② इतर अधिकारी व कर्मचारी, वस्तु व सेवाकर विभाग माझगाव मुंबई.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned with OKEN Scanner

फि॥ इम्रान मेहमद इनामदार, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.मुंबई यांचा [illegible]
कर नोंदवण्यात आलेली फिर्याद/जबाब हाच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल
संबोधण्यात यावा.

समक्ष

पंकज शिंदे
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.

Scanned with OKEN Scanner

फिर्याद

ला.प्र.वि.मुंबई
दि–२५/०१/२०२४

मी इम्रान महंमद इनामदार, वय ४४ वर्ष, नोकरी–पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग पत्ता– सर पोचखानावाला मार्ग, वरळी, मुंबई ४०००३० रा.ठी. एन.जी रिजन्सी, रूम नं ६०७, बाळकूम नाका, ठाणे (प.) मो.क्र. ८३०८८००६१०

मी वरील प्रमाणे असुन दि.२५/०३/२२ रोजी पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बृहन्मुंबई विभाग,मुंबई येथे एक टप्पा पदोन्नतीवर पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे व मा.अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,मुंबई यांच्या अधिनस्त कामकाज करतो.

दि.०९/११/२३ रोजी आम्हास जा.क्र.१०१५१/लाप्रवि/बृमुंवि/वा.१/उ.चौ. १०/२३ दि.०८/११/२३ अन्वये उघड चौकशी क्र. १०/२०२३ (पडताळणी क्र. ४०५४/२३) हे प्रकरण चौकशी कामी प्राप्त झाले. सदर उघड चौकशीच्या अनुषंगाने या पत्रासोबत सलग्न असलेल्या कागदपत्रांची पाहणी केली असता त्यामध्ये मा.नितीन पाटील विशेष राज्यकर आयुक्त तथा मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र मुंबई यांनी त्यांच्या अधिनस्त असलेले अधिकारी श्री अर्जुन प्रकाश सुर्यवंशी (सहायक राज्यकर आयुक्त), श्री मोहन राजाराम बागडे (राज्यकर उपायुक्त), श्री संदीप सुर्यकांत भालेराव (राज्यकर निरीक्षक) व श्री कमलेश बिरबल चव्हाण (राज्यकर अधिकारी) यांची त्यांनी कलम ६७ महाराष्ट्र वस्तु व सेवाकर अधिनियम प्रमाणे अर्जदार श्री धिरज संतोष पांडे, संचालक मे.धिरज पेट्रोकेमीकल्स अँन्ड गॅस प्रा.लि, ३१४, परसेपोलीस, प्लॉट नं ७४, एलआयसी बिल्डींग जवळ, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई यांच्या आस्थापनेमध्ये केलेल्या कार्यवाही संदर्भातील अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम अन्वये चौकशी करून पुढील योग्य ती कार्यवाही करणेकामी पाठविल्याचे दिसून आले.

प्राप्त झालेल्या कागदपत्रांवरून आम्ही श्री धिरज संतोष पांडे (संचालक मे.धिरज पेट्रोकेमीकल्स अँन्ड गॅस प्रा.लि) व श्री अर्जुन सुर्यवंशी (सहा.राज्यकर आयुक्त) श्री मोहन बागडे (राज्यकर उपायुक्त) तसेच तक्रारीशी संबंधीत श्री संदीप भालेराव (राज्यकर निरीक्षक), श्री कमलेश चव्हाण (राज्यकर अधिकारी), इडती पथकातील इतर अधिकारी श्रीमती युगंधरा अभिनंदन साळवी (राज्यकर निरीक्षक), श्री धिरज पांडे यांची मे.धिरज पेट्रोकेमीकल्स अँन्ड गॅस प्रा.लि आस्थापनेमध्ये कार्यरत त्यांचे स्टाफ साक्षीदार श्री जय राठोड (सेल्स एक्जीक्युटीव्ह) व कु.श्वेताली रमेश म्हात्रे (सिनीयर एक्जीक्युटीव्ह अकाउंटंट) यांची सखोल चौकशी करून सविस्तर जबाब नोंदवून चौकशी उपयुक्त कागदोपत्री व तांत्रीक पुरावे हस्तगत केले.

अर्जदार श्री धिरज संतोष पांडे यांनी त्यांच्या जबाबात सांगितले की, ते वर नमूद कंपनीव्दारे फ्युल ऑईल, ब्युटीमीन (डांबर) व इतर पेट्रोलीयम पदार्थांचा व्यापार करतात. त्यांचे GSTIN NO.27AAGCD8850N3ZY हा असुन याव्दारे ते व्यापार करून कर देयता भरत असतात. त्यांच्याकडे I-Phone व Samsung कंपन्यांचे मोबईल असुन I-Phone चे IMEI क्र 352569488446947 असा आहे. I-Phone वापरण्यास सुरक्षित असल्याने शक्यतो व्यापाराकरीता ह्याच मोबाईल चा ते वापर करीत असल्याचे सांगितले. दि.२५/०७/२३ रोजी ११.४५ वा श्री अर्जुन सुर्यवंशी (सहा.राज्यकर आयुक्त) सोबत त्यांचे पथकातील श्री संदीप भालेराव (राज्यकर निरीक्षक), श्री कमलेश चव्हाण (राज्यकर अधिकारी), श्रीमती युगंधरा साळवी (राज्यकर निरीक्षक) व श्रीमती सविता जगदाळे (राज्यकर निरीक्षक)

समक्ष
पंकज नामदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

असे अर्जदार यांच्या वर नमूद आस्थापनेमध्ये आले व त्यांनी अर्जदार यांना दि. २४/०७/२३ ही तारीख नमूद असलेली नोटीस (सर्च वॉरंट) दिली व अर्जदार यांनी दोन व्यापा-यांकडून माल खरेदी केला परंतु त्याच्यावरील जीएसटी चा विहीत वेळेत भरणा केला नसल्याने त्या संदर्भाने कार्यालयाची झडती घेवून कागदपत्रे ताब्यात घ्यायची असल्याचे सांगितले. यांनतर श्री अर्जून सुर्यवंशी यांनी अर्जदार धिरज पांडे यांच्या राहते घराची झडती घ्यायची आहे असे सांगून त्यांना त्यांचे राहते घरी खारघर येथे नेले. त्यावेळी श्री.संदीप भालेराव व श्रीमती युगंधरा साळवी हे त्यांच्या सोबत होते. खारघर येथे गेल्यावर अर्जदार यांनी श्री अर्जून सुर्यवंशी यांच्याकडे घरझडती घेण्याकरीता लागणा-या आदेशाची प्रत मागितली असता त्यांनी कोणतीही नोटीस न देता त्यांच्या पत्नी व लहान बाळ समक्ष घरझडती घेतली. यानंतर कार्यालयात परत आल्यावर झडतीची कार्यवाही तात्पुर्ती संपल्याचे सांगून एक पंचनामा तयार केला व त्यावर अर्जदार यांची सही घेतली परंतु त्यांना त्याची प्रत दिली नाही. यानंतर दिनांक २६/०७/२३ रोजी झडती पथक हे त्यांच्या अस्थापनेवर पुन्हा आले व श्री अर्जुन सुर्यवंशी व श्री संदीप भालेराव यांनी अर्जदार यांना दि.२९/०७/२३ पावेतो सन २०२०-२१ ची जीएसटी भरणा मधील फरकाची रक्कम (कर देयता, व्याज व शास्ती मिळून) ३.५० लाख रू भरण्याची सुचना दिली. जी अर्जदार यांनी तात्काळ भरत असलेबाबत सांगितले तसेच जबाब नोंदविण्याकरीता दि.२७/०७/२३ रोजी गै.अ श्री मोहन राजाराम बागडे यांचे समक्ष जीएसटी कार्यालयात हजर राहण्याची नोटीस दिली परंतु जीएसटी कार्यालयात येण्याची गरज नाही असे सांगून नोटीशीच्या अनुषंगाने त्यांचा जबाब नोंदविला नाही.

दिनांक २९/०७/२३ रोजी श्री मोहन बागडे हे श्री धिरज पांडे यांच्या ऑफीस मध्ये आले व त्यांनी श्री धिरज पांडे यांना त्यांची थकीत जीएसटी रक्कम ही ५ कोटींच्यावर असल्याने त्यांना अटक होउ शकते अशी भीती घातली. यावेळी श्री मोहन बागडे यांनी श्री अर्जुन सुर्यवंशी यांच्या समक्ष श्री धिरज पांडे यांना सांगितले की सदर कार्यवाही न करणे व केस पाच वर्ष बंद करण्याकरीता त्यांच्या काही वैयक्तीक मागण्या पुर्ण कराव्या लागतील व मागणीचे स्वरूप काय आहे हे श्री अर्जुन सुर्यवंशी सांगतील असे म्हणून ते निघून गेले. यानंतर श्री अर्जुन सुर्यवंशी व श्री संदीप भालेराव यांनी त्यांना चहा पिण्यास नेले व सदर कार्यवाही ही ५ वर्षाकरीता पुढे ढकलण्यासाठी श्री मोहन बागडे यांना लाच म्हणुन १ कोटी रू व श्री अर्जुन सुर्यवंशी व श्री संदीप भालेराव यांना १ कोटी रू असे दोन कोटी रूपये द्यावे लागतील असे सांगितले. यानंतर दिनांक ३१/०७/२३ ते ०४/०८/२३ रोजी दरम्यान श्री अर्जुन सुर्यवंशी हे श्री धिरज पांडे यांच्याकडे निरंतर लाचेच्या पैशांची मागणी करीत होते व एक रक्कमी दोन कोटी लाच न देता २५-२५ लाखाचे हफ्ते द्या व ५० लाख सोन्याच्या स्वरूपात लाच देण्यात यावी असे त्यांना सुचविले परंतु श्री धिरज पांडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने ते त्यांना टाळत होते. सदर बाब ही श्री धिरज पांडे यांच्या जबाबातुन स्पष्ट होते.

दिनांक ०५/०८/२३ रोजी श्री मोहन बागडे हे दुसऱ्यांदा श्री धिरज पांडे यांच्या आस्थापनेवर भेट देण्याकरीता आले व सदरची कार्यवाही पाच वर्षाकरीता लांबवितो असे सांगून त्यांच्याकरीता एक कोटी व श्री अर्जून सुर्यवंशी व श्री संदीप भालेराव यांचे करीता एक कोटी असे दोन कोटींच्या लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम न दिल्यास अशीच कार्यवाही सुरू ठेवून अटक करू असे श्री धिरज पांडे यांना धमकावले. यानंतर दिनांक ०७/०८/२३ रोजी संध्याकाळी २०.०० वा झडती कारवाई पूर्ण करून जी.एस.टी कार्यालय येथे परत जाताना श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी पुन्हा अर्जदाराकडे

समक्ष

पंकज जगदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

लाचेची मागणी केली व कार्यवाही संपली असून यापुढे जीएसटी ऑफीस मध्ये यावे लागेल अशी सुचना देवून त्यांनी काही कागदपत्रांची मागणी केली त्यावेळी श्री धिरज पांडे यांचे सेल्स एक्टीकिटीव्ह श्री जय राठोड यांनी आजपावेतो केलेल्या कार्यवाही बाबत लेखी समज देणेबाबत विचारणा केली असता झडती पथकामधील श्रीमती युगंधरा साळवी, राज्यकर निरीक्षक यांनी असे काही देता येत नाही असे सांगून सील करीता वापरण्यात येणाऱ्या नोटीशीचा फोटो काढून घेण्यास सांगितले. तसेच याच दिवशी दिनांक ०७/०८/२३ ते दि.१२/०८/२३ रोजी पावेतो श्री मोहन बागडे यांनी त्यांचे I-Phone मधील मो.क्र.९८६७२६३१११ वरील व्हॉट्सअॅप वरून श्री धिरज पांडे यांच्या I-Phone मधील मो.क्र.९११९५९३६८९ वरील व्हॉट्सअॅप वर पुढील प्रमाणे मेसेज व व्हॉटसॲप व्हॉईस कॉल्स करून श्री धिरज पांडे यांना त्यांचेवर सुरू असलेली कार्यवाही थांबविणार असल्याचे सांगून लाच देण्याकरीता दोन कोटी रू उपलब्ध नसतील तर तात्काळ संध्याकाळ पावेतो ५० लाखांची व्यवस्था करावी कारण त्यांचा मुलगा हा मेडीकल च्या पुढील शिक्षणाकरीता अमेरीका येथे जाणार असल्याने पैशांची आवश्यकता आहे व सदरची रक्कम ही वाशी येथून अथवा श्री धिरज पांडे जेथून सांगतील तेथून ते घेतील असे सुचविले. श्री धिरज पांडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने काही दिवसांची मुदत मागून घेतल्याची त्यांनी चौकशी दरम्यान सांगितले. अशावरून चौकशी दरम्यान श्री मोहन बागडे यांचे मो.क्र. ९८६७२६३१११ व श्री धिरज पांडे यांचे मो.क्र. ९११९५९३६८९ चे त्यांचेकडून प्राप्त करण्यात आलेले व्हॉट्सअॅप स्क्रिनशॉट्सचे अवलोकन केले असता आम्हास फक्त ०३ व्हॉट्सअॅप मेसेज व ०८ मिस्ड व्हॉईस कॉल्स झाल्याचे दिसुन आले.

| अ.क्र | व्हॉटसॲप कॉल/मेसेज करणाऱ्या व्यक्तीचे नाव व मोबाईल क्रमांक | दिनांक /वेळ | व्हॉटसॲप कॉल/मेसेज |
|---|---|---|---|
| ०१ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ०७/०८/२३ १२.५४ वा | call back असा मेसेज |
| ०२ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ०८/०८/२३ १४.४९ वा | Missed voice call |
| ०३ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ०८/०८/२३ १४.५० वा | Missed voice call |
| ०४ | श्री मोहन बागड (९८६७२६३१११) | १०/०८/२३ १९.५८ वा | Missed voice call |
| ०५ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ११/०८/२३ १४.४० वा | Missed voice call |
| ०६ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ११/०८/२३ १७.०५ वा | Missed voice call |
| ०७ | श्री धिरज पांडे (९११९५९३६८९) | ११/०८/२३ १७.०५ वा | Give me 10 minutes updating |
| ०८ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ११/०८/२३ १७.२२ वा | Missed voice call |
| ०९ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ११/०८/२३ १७.२३ वा | call back असा मेसेज |

समक्ष

पंकज नामदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ११/०८/२३ २०.२८ वा | Missed voice call |
| ११ | श्री मोहन बागडे (९८६७२६३१११) | ११/०८/२३ २२.२३ वा | Missed voice call |

यानंतर चौकशी दरम्यान श्री धिरज पांडे यांनी सांगितले की, दिनांक ०८/०८/२३ रोजी श्री जय राठोड हे जीएसटी भवन येथे जावुन श्री अर्जून सुर्यवंशी यांनी मागणी केलेप्रमाणे उपयुक्त कागदपत्रे सादर करून त्यांच्याकडे पोच मागितली असता ती त्यांनी देण्यास नकार दिला होता.

यानंतर चौकशी दरम्यान श्री धिरज पांडे यांनी असेही सांगितले की श्री मोहन बागडे हे दि.१२/०८/२३ ते १७/०८/२३ पावेतो सिक्कम दुर करीता गेले होते परंतु यादरम्यान ही त्यांनी अर्जदार यांच्याकडे वारंवार कॉल करून लाचेची मागणी केली. तसेच अर्जदार हे दि.२१/०८/२३ रोजी व्यवसाय निमीत्त कॉन्फरन्स करीता दुबई येथे गेले असता गै.अ.क्र २ श्री मोहन बागडे हे कॉल करून लाचेची मागणी करीत होते. याबाबत आम्ही श्री मोहन बागडे यांचेकडे चौकशी केली असता ते सिक्कीम टुरवर गेल्याचे त्यांनी कबूल केले परंतु लाचेबाबत संभाषण झाल्याचे नाकारले.

यानंतर चौकशी दरम्यान श्री धिरज पांडे यांनी सांगितले की दि. ०७/०९/२३ रोजी १८.४० वा. श्री मोहन बागडे यांनी त्यांच्या I-Phone मोबाईल वरून त्यांच्या I-Phone मोबाईलवर त्या दोघांमधील होणारे कॉल रेकॉर्डींग टाळण्याकरीता Face time audio call करून लाचेची मागणी केली. आम्ही श्री धिरज पांडे यांनी सादर केलेले Face time audio call च्या स्क्रिनशॉटची पाहणी केली असता अशाप्रकारचा कॉल झाल्याचे दिसुन आले परंतु दोघांच्या मध्ये झालेले संभाषण उपलब्ध होवू न शकल्याने आम्ही श्री मोहन बागडे यांना Face time audio call या सुविधेचा वापर करून श्री धिरज पांडे यांना कॉल करण्यामागचे प्रयोजन बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की श्री धिरज पांडे हे त्यांच्या सामान्य कॉलला उत्तर देत नसल्याने कर दायित्वाची थकीत रक्कमेची मागणी करण्याकरीता त्यांनी त्यांच्या I-Phone मोबाईल मधील Face time audio call या फोनकॉलींग सुविधेचा वापर केला होता.

यानंतर श्री धिरज पांडे यांनी चौकशी दरम्यान सांगितले की, दि.१६/०८/२३ रोजी श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी त्यांचे मो.क्र. ८४५०९५०१४७ वरून श्री धिरज पांडे यांचे मो.क्र.९११९५९३६८९ वर व्हॉट्सअॅप कॉल करून जीएसटी कार्यालयासमोरील हॉटेल ग्रीनफील्ड मध्ये भेटण्यास सांगितले. त्याठिकाणी श्री अर्जून सुर्यवंशी व श्री संदीप भालेराव हे तेथे उपस्थित होते. सदर भेटीवेळी श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी समन्स ची हार्ड कॉपी न देता त्यांच्या व्हॉट्सअॅप वरून श्री धिरज पांडे यांना दि.१७/०८/२३ रोजी त्यांच्या समक्ष चौकशी कामी कार्यालयात हजर येणेबाबतचे समन्स श्री धिरज पांडे यांच्या व्हॉट्सअॅप वर पाठविले. तसेच या भेटी वेळी त्यांनी यापुर्वी त्यांच्याकडे मागणी केलेल्या दोन कोटी लाचेच्या रक्कमेपैकी तात्काळ २५ लाख रूपये लाच देण्यास सांगितले. श्री धिरज पांडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचेची रक्कम देण्याचे टाळले. सदरबाबीची पुष्टी होण्याकरीता आम्ही श्री धिरज पांडे व श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी चौकशी दरम्यान सादर केलेले दि. १६/०८/२३ रोजीच्या व्हॉट्सअॅप स्क्रिन शॉट्सची पाहणी केली असता श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी त्यांचे मो.क्र. ८४५०९५०१४७ वरून श्री धिरज पांडे यांचे मो.क्र.९११९५९३६८९ वरील व्हॉट्सअॅप वर नोटीस चे फोटो पाठवून

समक्ष,

पंकज [illegible] शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

त्यांना दि. १७/०८/२३ रोजी जी.एस.टी कार्यालय, माझगांव, मुंबई येथे चौकशीकामी हजर राहणेबाबतचे समन्स बजावल्याचे दिसून आले.

यानंतर श्री धिरज पांडे यांनी चौकशी दरम्यान सांगितले की, दि.२१/०८/२३ रोजी श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी त्यांचे मो.क्र ८४५०९५०१४७ वरून त्यांचे मो.क्र ९११९५९३६८९ वर व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे १ कोटी रू. लाचेची मागणी केली. व्हॉट्सअॅप मेसेज खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | व्हॉटस्अॅप कॉल/मेसेज करणाऱ्या व्यक्तीचे नाव व मोबाइल क्रमांक | दिनांक /वेळ | व्हॉटस्अॅप कॉल/मेसेज |
|---|---|---|---|
| ०१ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.२० वा | What is update...DC sir asked |
| ०२ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.२५ वा | समन्स चे फोटो |
| ०३ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.३६ वा | Are bhai sir ka issue khatam kar aaj baki kuch nah |
| ०४ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.३७ वा | kal muze tumhare side lene ke liye kuch to hona chahiye na |
| ०५ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.४० वा | Saturday message aya aur ab tak tumhara response nahi hai...kya lagata hai... |
| ०६ | श्री धिरज पांडे (९११९५९३६८९) | २१/०८/२३ १३.५४ वा | sir ko abhi urjent kitna karna padega sir |
| ०७ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.५५ वा | kitna kar sakte hai maximum |
| ०८ | श्री धिरज पांडे (९११९५९३६८९) | २१/०८/२३ १३.५६ वा | Amount sir kitna karo urjent sir jissa Shant ho sakta hai sab |
| ०९ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.५७ वा | One CR. Sir ko |
| १० | श्री धिरज पांडे (९११९५९३६८९) | २१/०८/२३ १३.५७ वा | Ok updating |
| ११ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.५७ वा | K waiting |
| १२ | श्री धिरज पांडे (९११९५९३६८९) | २१/०८/२३ १३.५७ वा | Pura Cash Sir |
| १३ | श्री अर्जुन सुर्यवंशी (८४५०९५०१४७) | २१/०८/२३ १३.५८ वा | Sir ka to vahi hai na demand |
| १४ | श्री धिरज पांडे (९११९५९३६८९) | २१/०८/२३ १३.५८ वा | Ok |

वरीलप्रमाणे श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी श्री धिरज पांडे यांच्यामध्ये झालेल्या व्हॉट्सअॅप संभाषणाचे श्री धिरज पांडे यांनी सादर केलेल्या व्हॉट्सअॅप स्क्रिनशॉटची पाहणी केली असता श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी त्यांचेकडे रोख ०१ कोटी रू. लाचेची मागणी केल्याचे दिसून आले. श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी सादर केलेल्या व्हॉट्सअॅप

समक्ष
पंकज नामदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

स्क्रिनशॉटची पाहणी केली असता लाच मागणीचे संभाषण त्यांनी डिलीट केल्याचे दिसुन आले. चौकशी दरम्यान श्री अर्जुन सुर्यवंशी यांना व्हॉट्सअॅप मेसेजेस डिलीट करण्याचे कारण विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देवून सदरचे मेसेज हे अनावधानाने डिलीट झाल्याचे सांगितले. चौकशी दरम्यान दिसुन आले की, श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी व्हॉट्सअॅप चॅटींग दरम्यान Sir व DC sir हे शब्द श्री मोहन बागडे (राज्यकर उपायुक्त) यांना संबोधण्याकरीता वापरले आहेत. यानंतर श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी त्यांच्या अखत्यारीत नसतानाही श्री धिरज पांडे यांना दि. २२/०८/२३ रोजी जीएसटी कार्यालयात येताना पासपोर्ट, व्हिसा, स्टॅम्प इत्यादी कागदपत्रे व ०४ फोटो आणण्यास सांगितले. वरील सर्व संभाषणाचे व्हॉट्सअॅप स्क्रिनशॉट्सची पाहणी केली असता स्पष्ट झाले.

यानंतर चौकशी दरम्यान प्राप्त केलेली कागदपत्रे व श्री धिरज पांडे यांनी सांगितल्याप्रमाणे असे दिसुन आले की, त्यांनी दि.२५/०९/२३ रोजी मा. राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, माझगांव, मुंबई यांच्याकडे श्री अर्जुन सुर्यवंशी व श्री मोहन बागडे हे लाचेची मागणी करीत असल्याने कार्यवाही होणेबाबत आशय असलेली तक्रार दाखल केली. ज्यावरून मा.नितीन पाटील, विशेष राज्यकर आयुक्त तथा मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र मुंबई यांच्या मार्गदर्शनात चौकशी सुरू करण्यात आली. याच दरम्यान दि.०७/०९/२३ रोजी श्री धिरज पांडे यांनी त्यांच्या वकीलांमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No. 11261/23 (civil appeallate) अन्वये पिटीशन दाखल करून १) मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र, २) श्री अर्जुन प्रकाश सुर्यवंशी, ३) श्री मोहन राजाराम बागडे व इतर तीन यांना प्रतीवादी बनविले. सदर पिटीशन च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय यांनी दि.१२/१०/२३ व दि.१३/१०/२३ च्या सुनावणी दरम्यान श्री धिरज पांडे यांच्यावर वस्तू व सेवाकर विभाग,मुंबई यांच्याकडून सुरू असलेली थकीत जीएसटी भरणा रक्कमे संदर्भातील कारवाई वर तात्पुर्ती स्थगिती दिली असुन प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

श्री धिरज पांडे यांनी चौकशी दरम्यान केलेली तक्रार व सादर केलेल्या पुराव्यांची सत्यता व त्यामधील तथ्य पडताळून पाहण्याकरीता आम्ही श्री अर्जुन सुर्यवंशी (सहा. राज्यकर आयुक्त) व श्री मोहन बागडे (राज्यकर उपायुक्त) तसेच तक्रारीशी संबंधीत श्री संदीप भालेराव (राज्यकर निरीक्षक), श्री कमलेश चव्हाण (राज्यकर अधिकारी) व श्रीमती युगंधरा साळवी (राज्यकर निरीक्षक) यांची व साक्षीदार श्री जय राठोड व कु.श्वेताली म्हात्रे यांचे जबाब नोंदवून त्यांच्याकडून सन २०२२–२३ व सन २०२३–२४ या आर्थिक वर्षाचे GSTR3B व GSTR-1/IFF व GST DRC-03 ची कागदपत्रे हस्तगत केली. श्री अर्जुन सुर्यवंशी व श्री मोहन बागडे यांच्या मोबाईल ची पाहणी करून त्यांच्याकडून त्यांच्या व श्री धिरज पांडे यांच्या मध्ये झालेले व्हॉट्सअॅप चॅटींग/कॉलींग चे स्क्रिनशॉट्स हस्तगत केले. तसेच श्री अर्जुन सुर्यवंशी यांच्याकडून त्यांना देण्यात आलेले सर्च वॉरंट, त्यांनी लिहिलेल्या दैनंदीन कामाकाजाचे प्रोसिडींग्ज च्या झेरॉक्स/सत्यप्रती प्राप्त केल्या.

चौकशी दरम्यान केलेली विचारपुस व उपलब्ध कागदपत्रांची एकमेकांशी पडताळणी केली असता असे दिसून आले की, श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी श्री मोहन बागडे यांना प्रस्ताव सादर करून श्री धिरज पांडे यांनी जीएसटी ची संभाव्य रक्कम (Excess input tax credit) रू १० कोटी थकीत ठेवली असल्याने त्यांच्या अस्थापनेची झडती घेवून त्यामध्ये तथ्य मिळून आल्यास महसूल गोळा करण्याची मंजुरी मिळण्याकरीता सर्च वॉरंटची मागणी केली होती. सदर प्रस्तावास मा.राज्यकर सह आयुक्त

समक्ष
पंकज प्रामदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

श्रीरंग नायक यांची मंजुरी मिळाल्याने श्री मोहन बागडे यांनी दि.२४/०७/२३ रोजी त्यांची सही असलेले झडती घेण्याचे अधिकार प्रदान करणारे सर्च वॉरंट (INV 01) जारी केले ज्यामध्ये Date of visit (भेटीची तारीख) ही दि.२५/०७/२३ अशी नमूद होती. Date of visit (भेटीची तारीख) २५/०७/२३ रोजी श्री अर्जुन सुर्यवंशी हे वर नमूद स्टाफसह श्री धिरज पांडे यांच्या अस्थापनेची थकीत जीएसटी च्या चौकशीच्या अनुषंगाने गेले होते. मे.धिरज पेट्रोकेमीकल्स व गॅस प्रा.लि.नवी मुंबई या अस्थापनेची त्यांनी दि. २५/०७/२३ ते दि.०७/०८/२३ पावेतो शासकीय सुट्टी धरून १४ दिवस झडती ची कार्यवाही केली व श्री मोहन बागडे यांच्या तोंडी आदेशाने दि.०७/०८/२३ रोजी २०.०० वा. कार्यवाही समाप्त केल्याचे चौकशीत दिसून आले.

यानंतर श्री अर्जुन सुर्यवंशी यांना त्यांनी श्री धिरज पांडे यांना व्हॉट्सअॅप मेसेज पाठवून त्यांच्याकडे केलेल्या लाचेची मागणीबाबत विचारपुस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. यावरून त्यांनी केलेल्या लाचेच्या मागणीबाबत त्यांना पुर्ण जाणीव असल्याचे दिसून आले. तसेच श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी दि.२१/०८/२३ रोजी श्री धिरज पांडे यांना व्हॉट्सअॅप मेसेज पाठवून त्यांचे पासपोर्ट, व्हिसा, स्टॅम्प व ४ पासपोर्ट साईज फोटो आणून त्यांच्याकडे जमा करणेबाबत सांगितले असल्याचे श्री धिरज पांडे व व श्री अर्जुन सुर्यवंशी यांच्या मोबाईल मधील व्हॉट्सअॅप मसेजेस व उपलब्ध स्क्रिनशॉट्स वरून प्राथमीकदृष्ट्या खरे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच श्री धिरज पांडे यांनी सादर केलेल्या Face time audio call संभाषणाचे मोबाईल स्क्रिनशॉट्स ची पडताळणी केली असता श्री मोहन बागडे यांनी श्री धिरज पांडे यांना दि. ०७/०९/२३ रोजी Face time audio call केल्याचे दिसून आले. तसेच चौकशी मध्ये असेही निष्पन्न झाले की श्री धिरज पांडे यांनी मर्जीने त्यांच्या संभाव्य थकीत जीएसटी कर भरणा रक्कमेपैकी दि.२९/०७/२३, दि.०४/०८/२३ व दि. ०५/०८/२३ रोजी असे एकूण ७,८१,०००/—रू कर भरणा केल्याचे त्यांनी दिलेला जबाब व चौकशी दरम्यान प्राप्त कागदपत्रे श्री अर्जुन सुर्यवंशी व श्री मोहन बागडे यांचे देण्यात आलेल्या जाब—जबाबावरून दिसून आले.

चौकशी दरम्यान श्री धिरज पांडे यांनी सादर केलेल्या पेन ड्राईव्ह मधील साक्षीदार श्री जय राठोड व श्री कमलेश चव्हाण (राज्यकर अधिकारी) यांच्या मधील गौर बंजारा (गोरमाटी) भाषेमधील व्हॉट्सअॅप कॉल रेकॉर्डींग चे साक्षीदार श्री जय राठोड यांच्या मदतीने मराठी भाषेमध्ये रूपांतर करून त्याची ट्रान्सक्रीप्ट चे सखोल वाचन केले असता त्यामध्ये श्री कमलेश चव्हाण (राज्यकर अधिकारी) यांनी अर्जदार यांच्या बाबत अपशब्द वापरून त्यांनी रिट पिटीशन दाखल केल्याने नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले. याबाबत अर्जदार व साक्षीदार श्री जय राठोड यांचे जबाबावरून प्राथमीकदृष्ट्या याची पुष्टी होत आहे.

उघड चौकशी च्या अनुषंगाने कागदोपत्री व तांत्रीक पुराव्यांची पडताळणी केली असता श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी श्री धिरज पांडे यांचे कडे लाचेची मागणी केल्याचे सिध्द होत असून सदर कागदोपत्री पुरावे हे समर्थनीय पुरावा (supportive evidence) असल्याचे दिसून येते. तसेच चौकशी दरम्यान श्री अर्जुन सुर्यवंशी यांच्याकडून त्यांचे व श्री धिरज पांडे यांच्या मध्ये झालेल्या व्हॉट्सअॅप चॅटींग, कॉलींग चे स्क्रिनशॉट्स, मे. धिरज पेट्रोलियम व गॅस प्रा.लि नवी मुंबई येथे केलेल्या अन्वेषण कारवाई दरम्यान त्यांनी लिहिलेले दैनंदिन कार्यवाही पत्रक (प्रोसिडींग शिट), अर्जदार यांचे जबाब, Investigation visit proposal, Deposition, GST INS-01 इन्स्पेक्शन व सर्च वॉरंट, GSTR3B, घरझडती पंचनामा, समन्स इत्यादी कागदपत्रे प्राप्त केली असून सदर कागदपत्रे ही त्यांनी श्री धिरज

समक्ष,

पंकज ... शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

पांडे यांच्याकडे केलेल्या लाच मागणी ची पुष्टी देणारे समर्थनीय पुरावा (supportive evidence) असल्याचे दिसुन येत आहे. सदर कागदपत्रांमधील दि.१८/०८/२३ व दि. १९/०८/२३ रोजीच्या प्रोसिडींग शिट ची पाहणी केली असता श्री अर्जुन सुर्यवंशी यांनी झालेल्या कार्यवाही च्या सारांश मध्ये अशी नोंद केल्याचे दिसून येते की श्री धिरज पांडे यांनी सांगितले की ते त्यांच्या जीएसटी अकाउंट च्या इलेक्ट्रॉनिक कॅश लेजर मध्ये कमीतकमी ०१ कोटी रू जमा करतील व सदर रक्कम त्यांच्या कॅश लेजर मध्ये जमा झाल्यानंतर ते जीएसटी कार्यालयास कळवतील. या नोंदी नंतर ते अशी ही नोंद करतात की श्री धिरज पांडे हे त्यांचे पासपोर्ट व व्हिसा जीएसटी कार्यालयात जमा करतील. या नोंदी समोर श्री धिरज पांडे यांची सही व पृष्ठाच्या शेवटी स्वत:ची सही केल्याचे दिसुन आले.

एकंदरीत सदर उघड चौकशीअंती प्राथमीक दृष्टया असे दिसून येत आहे की श्री अर्जुन प्रकाश सुर्यवंशी (सहा.राज्यकर आयुक्त) व त्यांच्या पथकाने श्री मोहन वागडे (राज्यकर उपायुक्त) यांनी पारीत केलेल्या सर्च वॉरंट (INS-01) च्या अनुषंगाने दि. २५/०७/२३ चे ११.४५ वा ते दि.०७/०८/२३ चे २०.०० वा पावेतो श्री धिरज संतोष पांडे, संचालक मे.धिरज पेट्रोकेमीकल्स ॲन्ड गॅस प्रा लि,वाशी नवीमुंबई यांच्या सदर अस्थापनेमध्ये थकीत कर दायित्वासंबंधाने अन्वेषण, कारवाई केली व दि. ०७/०८/२३ रोजी अन्वेषण कारवाई संपल्यानंतरही श्री धिरज पांडे यांना त्यांचेवर थकीत असलेल्या करदायित्वाच्या रक्कमेचा स्पष्ट वर्णन असलेली नोटीस ज्यामध्ये कर,दंड व शास्तीच्या रक्कमेचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे अशी कोणत्याही प्रकारची नोटीस देवून थकीत कर भरण्याच्या स्पष्ट सुचना दिल्याचे दिसून येत नाही. याउलट श्री धिरज पांडे यांच्याकडे दि.२१/०८/२३ रोजी १३.३६ वा ते १३.५८ वा. दरम्यान त्यांच्या मोबाईलवर व्हॉट्सॲप मेसेज पाठविले ज्यामध्ये त्यांचे वरीष्ठ अधिकारी राज्यकर उपायुक्त यांनी पैशांची मागणी केली आहे असे सांगून त्यांच्यावर सुरू असलेल्या थकीत संभावीत करदायित्वाच्या कारवाई मध्ये मदत करण्याचे भासवून एक कोटी रूपये नगदी लाचेची मागणी केली आहे. सदर लाचेची मागणी उघड होउ नये याकरीता त्यांनी त्यांच्या मोबाईल मधील दि.२१/०८/२३ रोजीचे लाच मागणीचे सर्व व्हॉट्सॲप मेसेजेस डिलीट करून पुरावा नष्ट केला. यावरून त्यांना त्यांनी केलेल्या सदर बेकायदेशीर कृत्याची व कायद्याची पुर्ण जाणीव असल्याचे दिसून येत आहे.

तरी श्री अर्जुन प्रकाश सुर्यवंशी यांनी श्री धिरज पांडे (संचालक मे.धिरज पेट्रोकेमीकल्स व गॅस प्रा.लि.वाशी, नवीमुंबई) यांचेवर अनुग्रह दाखवून दि.२१/०८/२३ रोजी १३.३६ वा ते १३.५८ वा. कायदेशीर परिश्रमाखेरीज परितोषण म्हणून व्हॉट्सॲप मेसेज व्दारे एक कोटी रू रोख लाचेची मागणी केल्याचे दिसून येत आहे तसेच सदर लाच मागणीच्या कृत्या मध्ये वस्तू व सेवाकर विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग नाकारता येत नसल्याने श्री अर्जुन प्रकाश सुर्यवंशी (सहा.राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, मुंबई) व इतर अधिकारी व कर्मचारी यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम २०१८ कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा करीता सदरची फिर्याद देत आहे.

समक्ष

पंकज रामदेव शिंदे
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(इमरान म.इनामदार)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि.मुंबई



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार / फिर्यादीने उशिरा तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ चौकशी अंती गुन्हा दाखल

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved ........

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any ........

पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

ले वस्तु व सेवाकर विभाग माझगाव येथे अन्वेषण-क विभागात कार्यरत असलेले आलोसे क्र. ① व इतर अधि... वरिल नमूद वेळी व दि...
...तक्रारी केली असता। असे निष्पन्न झाले की यातील तक्रारदार धिरज पेट्रोकेमीकल्स अँड मेसर्स ...वाशी व इतर...
...चिमणगाडे यांच्या आस्थापनेवर दि. २३/७/२३ ते दि. २/८/२३ रोजी पर्यंत अन्वेषण (छापा) कार्यवाही करण्यात आली...
त्यांना मदत करण्यासाठी कराळे सचिन चिमणगाडे यांच्यावर अनुग्रह दाखवून दि. २/८/२३ रोजी झाले हा...
...कायदेशीर परिश्रमाव्यतिरिक्त पारितोषण म्हणून व्हाट्स अॅप मेसेज द्वारे रु. १ कोटी रोख लाचेची मागणी केल्या...
...र यांना निष्पन्न झाल्याने व तक्रार सदर लाच रकमेमध्ये वस्तु व सेवाकर विभागातील इतर अधिकारी यांच्या...
...नाकारता येत नसल्याने तक्रारदार यांनी आलोसे क्र. ① व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुद्ध
...ार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये फिर्याद दिली आहे.

केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. पंकज शिंदे, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name पंकज शिंदे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. ........

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court........

..., 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

...opy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

...tachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner